नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/०७/२०२६ (गुरूवार )

## खुनाच्या गुन्हयात खोटी साक्ष देण्यासाठी अपहरण करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद; वकीलासह चौघांना अटक

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलीसांनी खुनाच्या गुन्हयात खोटी साक्ष देण्यासाठी साक्षीदाराचे अपहरण करून त्याच्यावर दबाव आणणाऱ्या व जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करीत चार आरोपींना अटक केली आहे.

सन २०२२ मध्ये पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी नामे रोशन कारगावकर, रा. राम मंदरीमागे, कोष्टी मोहल्ला, इतवारीपेठ ,उमरेड, जि नागपुर आणि बादल लेंडे, रा. उमरेड जि नागपुर यांच्या विरूध्द अपराध क्रं ४४५/२०२२ कलम ३०२, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद आहे. दिनांक २८/०७/२०२६ रोजी रात्री सुमारे ०७.३० ते ०८.०० वा. दरम्यान आरोपी राकेश शंकर महाकाळकर व त्याचे दोन साथीदार यांनी वर नमुद गुन्हयातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराला त्याच्या घराच्या बाहेर बोलावुन त्याला जबरदस्तीने आपल्या कारमध्ये बसवून त्याचे अपहरण केले तसेच त्याला रात्रभर डांबुन ठेवुन दिनांक २९/०७/२०२६ रोजी सत्र न्यायालय नागपूर येथे घेऊन गेले. नागपूर येथे नेल्यानंतर आरोपी पक्षाचे वकीलाने आणि आरोपींनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारास सदर प्रकरणात आरोपींच्या सांगण्याप्रमाणे खोटी साक्ष देण्यासाठी दबाव आणला आणि प्रलोभन दिले तसेच जर सांगितल्याप्रमाणे साक्ष दिली नाही

तर तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १४०(४),२३२(१),१२७(७),३५१(३),३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी दिनांक ३०/०७/२०२६ रोजी आरोपी क्र १) राकेश शंकर महाकाळकर, वय २६ वर्षे, इतवारीपेठ, उमरेड २) अक्षय वसंत पाटील, वय ३० वर्षे, रानबोडी, ता कुही, जि. नागपुर ३) प्रद्युम्न दिलीप कुरुतकर, वय २६ वर्षे, रानबोडी, ता कुही, जि. नागपुर ४) ॲड. रमेश रावलानी, ५७ वर्षे, रा. जरीपटका, नागपूर यांना अटक करण्यात आले आहे. पुढील तपास उमरेड पोलीस करीत आहेत. आरोपी क्रं १ आणि आरोपी क्रं ३ यांच्यावर यापुर्वी पोलीस स्टेशन उमरेड येथे गंभीर गुन्हयांची नोंद आहे.

## अतिवृष्टीच्या आणि पुर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलिसांच्या उपाययोजना

संभाव्य अतिवृष्टी व पूरस्थिती लक्षात घेऊन नागपूर ग्रामीण पोलीस दलाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात सर्वंकष नियोजन केले आहे. जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून, पूरप्रवण भाग, नदी—नाले, धरण परिसर, पूल व पाण्याखाली जाणारे रस्ते यांची नियमित पाहणी करण्यात येत आहे.

पोलीस स्टेशन काटोल :— काटोल परिसरात अतिवृष्टी अथवा पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस ठाणे काटोलकडून आवश्यक ती पूर्वतयारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. आज दिनांक ३०/०७/२०२६ रोजी परिसरातील पोलीस पाटील यांची बैठक घेऊन अतिवृष्टी अथवा पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्यास गावातील नागरिकांना आगाऊ सूचना देणे, संभाव्य धोकादायक ठिकाणांची माहिती पोलीस प्रशासनास देणे तसेच आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. काटोल तालुक्यातील संभाव्य पूरप्रवण व धोकादायक ठिकाणांची माहिती घेण्यात आली आहे. रिधोरा डॅम परिसर महत्त्वाचा असल्याने रिधोरा गावातील नागरिकांची बैठक घेऊन त्यांना अतिवृष्टी व पूर परिस्थितीबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या तसेच सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. काटोल पोलीसांनी रिधोरा

धरण परिसरास भेट देऊन पाहणी केली. यावेळी आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यात येणारे बोट, लाईफ जॅकेट, दोरी, टायर व इतर बचाव साहित्य सज्ज ठेवण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन नरखेड :— आज दिनांक ३०/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत अमरावती व नागपूर जिल्हा सीमेवरील वर्धा नदी झुंज येथे भेट दिली. तसेच पाण्याची पातळी वाढत असल्याने ठिकाणी बॅरिकेड्स तयार ठेवुन सुरक्षिततेच्या संबंधाने उपाय योजना करण्यात आल्या आहे.






नागपूर ग्रामीण पोलीस
नागपूर ग्रामीण पोलीस

# २ तासात घरफोडीचा गुन्हा उघड, ०१ आरोपी अटक, चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान :–** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनात दिनांक २९/०७/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, कन्हान पोलीस स्टेशन यांच्या नेतृत्वात कन्हान पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून अवघ्या २ तासात आरोपी निष्पन्न करून घरफोडीचा गुन्हा उघड केला आहे.

पोलीस स्टेशन कन्हान नागपुर ग्रामीण येथील दि. २१/०७/२०२६ चे ०९.०० वा. ते दि. २७/०७/२०२६ चे १८.०० वा. दरम्यान मौजा धरमनगर कन्हान येथील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादी नामे सौ. माधुरी रंजितसिंग ठाकुर, वय ३८ वर्ष, रा. वार्ड क्र. ६, धरमनगर कन्हान, ता. पारशिवनी यांचे घराचे मुख्य दाराचे कुलुप कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील आलमारीमध्ये ठेवलेले सोने चांदीचे दागीने व नगदी ११,०००/–रूपये असा मुद्देमाल चोरी केल्या च्या तक्रारी वरून पोस्टेला अप क्र. ४६९/२६ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ (अ) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान कन्हान पोलीसांना गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुरावे यांच्या आधारे दिनांक २९/०७/२०२६ रोजी नमुद गुन्हयातील आरोपीचा शोध घेवुन **आरोपी आकाश उर्फ दादु यशवंत दराडे, वय २७ वर्ष, रा. धरम नगर कन्हान, ता. पारशिवनी** याला कन्हान पोलीसांनी कन्हान येथुन ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्ह्याबाबत कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने सदर घरफोडीचा गुन्हा केला असल्याची माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) सोन्याचांदीचा ऐवज किंमती ४६,०००/– रूपये, २) गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटरसायकल असा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**


BALMAIN
MH 40 RD 0214

## ४ तासात बकरी चोरीचा गुन्हा उघड, १ आरोपी अटक
## ४० हजारांचा मुद्देमाल जप्त
## देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री रमेश बरकते , उपविभागिय पोलीस अधिकारी , रामटेक यांच्या मार्गदर्शनात देवलापार पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री नारायण तुरकुंडे यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून बकरी चोरीचा गुन्हयाची अवघ्या ४ तासात उकल केली.

पोलीस स्टेशन देवलापार येथे दाखल अपराध क्रमांक ३४३/२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये या गुन्हयाच्या तपासादरम्यान **अवघ्या ४ तासात गुन्हयाच्या उकल करत सदर गुन्हयात आरोपी नितीन सोमलाल भलावी वय ३६ वर्षे, रा. मोहगाव (यादव) ता.कुरई जि. सिवनी (मध्यप्रदेश) यास ताब्यात घेतले.** आरोपींची चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींच्या ताब्यातुन चोरीस गेलेले १ बोकड किंमती २०,०००/— रूपये आणि चोरी करण्यासाठी वापरलेले मोटर सायकल क्र. एम पी २०/एम एस ६६२१ किंमती २०,०००/— रूपये असा एकुण ४०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नमुद आरोपी यास अटक करण्यात आली आहे.**

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ; ०६ गोवंश जनावरांची सुटका, देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक ३०/०७/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४, जबलपूर ते नागपूर जाणाऱ्या रोडवर जुन्या पोलीस स्टेशन देवलापार समोर नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान

रेनॉल्ट कार क्र. एम एच ०२/सी पी ४७६५ येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **चालक नामे अल्ताब राजा वल्द रशीद खान, वय ३६ वर्ष, रा. यशोधरा नगर, उप्पलवाडी, नागपूर** हा मिळुन आला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०६ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक रेनॉल्ट कार क्र. एम एच ०२/सी पी ४७६५ किंमती २,५०,०००/— रूपये आणि ०६ गोवंश जनावरे किंमती ९०,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,४०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी वाहन चालक नामे अल्ताब राजा वल्द रशीद खान, वय ३६ वर्ष, रा. यशोधरा नगर उप्पलवाडी नागपूर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम २८१ भा.न्या.सं सहकलम ११(१),(ड) प्राण्यांचा छळ अधिनियम , सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस कायदा, सहकलम १८४ मोटर वाहन कायदयाअन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## दुखापत करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन मौदा** :— फिर्यादी सौ माया प्रकाश गजभिये, वय ४० वर्षे , रा शिवनी ता मौदा यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र. ८३/२०२० कलम ३२४,५०४,५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०७/०२/२०२० रोजी यातील **आरोपी नामे प्रशांत रामेश्वर पटले ,वय ३३ वर्षे, रा शिवणी ता. मौदा** याने फिर्यादीचे घरासमोर येवुन माझे ट्रॅक्टरचे पैसे परत दे असे म्हणुन सदर गुन्हयातील फिर्यादी ,फिर्यादीचे पती आणि मुलगा यांना काठीने मारहाण करून दुखापत करून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली.

श्री रोशन शिंदे , पोलीस हवलदार, ब.न १९०९ नेम पोलीस स्टेशन मौदा यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ३०/०७/२०२६ रोजी मा. प्रथमश्रेणी न्यायधीश, मौदा एल. एम. पठाण यांनी नमुद आरोपी नामे प्रशांत रामेश्वर पटले ,वय ३३ वर्षे, रा शिवणी**

**ता. मौदा यास कलम ३२४ भादवि मध्ये दोषी ठरवुन २०००/— रूपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली तसेच दिड वर्षाच्या चंगल्या वर्तवणुच्या हमीपत्र घेण्यात आला आहे.**

सरकारचे वतीने सरकारी अभियोक्ता श्रीमती एस व्ही रामटेके यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. सारीन दुर्गे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मौदा , यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार पोअं सतिष मोटघरे ब. नं. १७४ यांनी मदत केली आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २९/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी १) वसीम अब्दुलाह अन्सारी, वय ३९ वर्ष, रा. अन्सार मस्जिद जवळ प्लॉट नं. ६६०, एच एन ओ नं.७८, अन्सार नगर मोमीनपूरा, महात्मा फुले बजार, नागपूर २) मो. सुलतान मो. रमजान अन्सारी, वय ३४ वर्षे, मोहमदा मदरसा जवळ महात्मा फुले बाजार, नागपूर ३) अशोक झीनो कहार, वय ५६ वर्षे, रा. वार्ड नं. ११, हनुमान मंदीर जवळ बाजार, मोहल्ला उमरहर, उम्रद छिंदवाडा मध्यप्रदेश हे मौजा वाकी दरबार परीसर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी नामे १) विनोद गोपालसिंग निस्ताने, वय ३३ वर्ष, रा. चिचोली, त. पारशिवनी, जि. नागपूर २) शूद्धोधन चंद्रभानजी मेश्राम, वय ३५ वर्ष, रा. चिचोली, त. पारशिवनी, जि. नागपूर हे मौजा चिचोली काबुल कंधार दर्गा परिसर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०९ गुन्हे नोंद. एकुण ९०६१/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २९/०७/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ९०६१/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे सशिनंद भारत गेडाम, वय ३५ वर्षे, रा. टेंभरी, ता. हिंगणा, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे सोनु छोटेलाल मेश्राम, वय २४ वर्ष, रा. रिंगणाबोडी हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) राहुल रामेश्वर धुर्वे, रा. अंबाडा सोनक, ता. काटोल, जि. नागपुर २) अनिल महादेवराव वाहाणे, रा. लाडगाव, ता. काटोल, जि. नागपुर हे अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे खुशाल परसराम लैसिंह, वय ३४ वर्ष, रा. परसोडी दिक्षीत, ता. नरखेड हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे रूपेश नारायण शिवनकर, वय ३९ वर्ष, रा. धरमपेठ नांद, ता. भिवापुर, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे जितु जिवन ठाकरे, रा. मनसर रामटेक तसेच सुनिल रतन हेडाउ, रा. वार्ड क्र ०२, रा. मनसर माइन रामटेक, राजकुमार धुर्वे, रा. वार्ड क्र ०२, रा. मनसर माइन, रामटेक हे अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे तिलक चंद्रभाण गोलाईत, वय ५६ वर्ष, रा. झेंडा चौक, सावनेर हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद

दिनांक २९/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू, विदेशी दारू, ईतर साहित्य असा एकुण १२,३४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे कैलास निमदेव वाघधरे, वय ४५ वर्ष, रा. अडेगाव याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे सुमित बंडुजी बिसाद्रे, वय २९ वर्ष, रा. सिंगारखेडा ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** आरोपी १) सुरेश व्यंकटराव गाडवे, रा. तारा, ता. नरखेड २) गणेश रामचंद्र ओरोडीया, वय ३५ वर्ष, रा. मायवाडी, ता. नरखेड ३) विनोद चरणसिंग कुमेरिया, वय ३६ वर्ष, रा. मायवाडी, ता. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** आरोपी तेजस उमेश नासरे, वय २६ वर्षे, रा. शेडेश्वर, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी १) महेंद्र मनोहर वर्मा, वार्ड नं. १७, पहलेपार सावनेर, ता. सावनेर नागपूर २) प्रतिक देवराव पगारे, वय ३५ वर्ष, रा. बाजार चौक, टॉकीज सावनेर, ता. सावनेर ३) रितेश बालाजी छायावाट, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०९, चिचपुरा सावनेर, ता. सावनेर नागपुर ४) आसाराम ग्याप्रसाद देसाई, वय ४० वर्षे, रा. पहीलेपार वार्ड क्र. ११, वडार मोहल्ला, सावनेर ता, सावनेर नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा येथे** आरोपी दशरत किसान कुंभले, वय ३६ वर्ष, रा. भूगाव ता. कामठी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा येथे** आरोपी १) प्रकाश बाबुलाल गावंडे, वय ५० वर्ष, रा. रामनगर मौदा २) निकेश शिवदास खोब्रागडे, वय ४८ वर्ष, रा. पवनी, जि. भंडारा ३) मिथुन शेषराव वाघमारे, वय ३६ वर्ष, रा. आजनगांव यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे १)** दिलीप महादेव माहुले, रा. वार्ड क्र ०१, नगरधन रामटेक, जि. नागपुर २) आदित्य सुरेश कुमरे, रा. गुगलडोह, ता. रामटेक, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण ४९५० मिली देशी दारू, १४४० मिली विदेशी दारू, ०७ लिटर मोहाफुल दारू, १८० लिटर मोहाफुल सडवा ईतर साहित्य असा एकुण १२,३४०/— रूपयांचा मुद्‌देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्‌देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने